# 'स्वजलधारा योजनेच्या प्रस्तावात राज्य शासनाकडून राजकारण'

दै. लोकसत्ता दि. १० मार्च २००३

**खडकवासला, ९ मार्च (वार्ताहर)-** स्वजलधाराचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविताना राज्यातील लोकशाही आघाडी सरकारने राजकारण केले असून, असा डावलण्यात आलेल्या गावांना केंद्र शासनाच्या वतीने थेट निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे प्रतिपादन शिवसेनेचे लोकसभेतील घटनेते व स्वजलधारा योजना समितीचे अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

हवेली तालुक्यातील गोहे बुद्रुक येथील नळपाणीपुरवठा योजनेच्या वाढीव टाकीचे भूमिपूजन खासदार खैरे यांच्या हस्ते झाले. या टाकीसाठी शिवसेनेचे राज्यसभा खासदार एकनाथ ठाकूर यांच्या विकास निधीतून अडीच लाख रुपये मंजूर झाले आहेत.

**सर्व नेते हजर**

भूमिपूजनप्रसंगी शिवसेना उपनेते व जिल्हा संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर, भारतीय विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष अ‍ॅड. गणेश सातपुते, जिल्हा समन्वयक दत्ताजी धावडे, माजी जिल्हाप्रमुख आर. डी. रायकर, जिल्हा परिषद सदस्य व हवेली तालुकाप्रमुख नामदेव तांबे, सोमनाथ लांडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास मते, मुळशी तालुका प्रमुख शरद दभाने, जिल्हा श्रमिकप्रमुख दत्तात्रय सुर्वे, नगरसेवक हरिश्चंद्र दांगट, मुळशीचे उपसभापती भानुदास पानसरे, हवेली शिक्षक सुनील जगताप, शहर उपप्रमुख दिलीप गासिदे, वेल्हा तालुकाप्रमुख भरत किन्हाळे, तालुका उपप्रमुख रमेश कोंडे, तानाजी पवळे, वृक्ष संवर्धन समितीचे सदस्य किशोर रजपूत आदी पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना खैरे असे म्हणाले की, सध्या राज्यात जी विकासकामे चालू आहेत, ती सर्व केंद्र शासनाच्या विविध योजनांतील असून, राज्यातील आघाडी सरकार मात्र या कामांचे श्रेय लाटण्याचे प्रयत्न करीत आहे.

पंतप्रधान सडक योजना, सुवर्णग्राम योजना, इंदिरा आवास योजना, स्वजलधारा आदी योजनांच्या माध्यमातून केंद्राकडे येत असलेल्या निधीमधून होणाऱ्या कामांची भूमिपूजने, उद्घाटने काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार-आमदार करीत आहेत.

**प्रतिसाद उत्तम**

स्वजलधारा योजनेस राज्यातून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. परंतु, राज्यातील आघाडी शासनाने मात्र केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविताना पक्षपातीपणा केल्याचे काही ठिकाणी दिसून आले आहे. शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या ताब्यातील ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदा यांच्याकडून आलेले प्रस्ताव केंद्राकडे पाठविले नाहीत, हे लक्षात आल्यानंतर यावर उपाय म्हणून अशा स्थानिक स्वराज्य संस्थांना थेट निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे खासदार खैरे यांनी या वेळी सांगितले.

शिवसेना उपनेते व जिल्हा संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर या वेळी म्हणाले की, या मतदारसंघात सलग पंधरा-वीस वर्षे आमदार-खासदार म्हणून निवडून आलेल्यांनी भविष्यकाळाचे कोणतेही नियोजन केलेले नाही, मतदारसंघात ते फिरकत नाहीत, त्यांना जनतेच्या गरजा, समस्या, जाणून घेण्याची गरज वाटत नाही, या मंडळींनी मनात घेतल्यास विकास होऊ शकतो. परंतु, तो करण्याची जबरदस्त इच्छा मनात असली पाहिजे, येत्या निवडणुकीत शिवशाहीचे सरकार येणार आहे, त्यामध्ये आपला हक्काचा सेनेचा वाघ, मर्दमावळा आमदार म्हणून पाठविणे हे आपले कर्तव्य आहे, त्यामुळे वीज, पाणी, रस्ता मिळविण्यासाठी जनतेला रस्त्यावर यावे लागणार नाही. त्यामुळे जनतेने या परिवर्तनाच्या लाटेत सहभागी होण्याची आज गरज आहे, असे शिवसेना उपनेते व जिल्हा संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर यांनी या वेळी सांगितले.

**ग्रामपंचायतींना वगळले**

जिल्ह्यातील स्वजलधारा योजनांसंबंधी बोलताना जिल्हा समन्वयक दत्ताजी धावडे म्हणाले की, या योजनेचे प्रस्ताव मंजूर करताना २५ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च असणाऱ्या ग्रामपंचायतींना यातून वगळले आहे. त्यामुळे मोठ्या गावांना या योजनेचा फायदा होऊ शकत नाही, तेव्हा पुणे जिल्ह्यासाठी हे निकष शिथील करून मोठ्या गावांना पाण्याची गरज पाहून त्यांचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत खासदार खैरे यांनी पुढाकार घ्यावा असे ते म्हणाले.

**बक्षीस वितरण**

याप्रसंगी आर. डी. रायकर, विलास मते, नामदेव तांबे यांचीही भाषणे झाली. या वेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त भरविण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ व वारकरी संप्रदायातील ज्येष्ठांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख काका खिरीड यांनी केले, सूत्रसंचालन विभागप्रमुख नितीन वाघ यांनी, तर आभार शंकर नानगुडे यांनी मानले. ■

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.